सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

## आखातातील युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत; खाद्यतेल १० ते १२ टक्क्यांनी महागले

मुंबई (किसान न्युज): आखातातील युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, त्याचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या दरावर होत आहे. सोयाबीन, सूर्यफूल, मका आणि पाम तेलाची आयात मोठ्या प्रमाणात घटल्याने किमतीत १० ते १२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. आखातातील युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, त्याचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या दरावर होत आहे. सोयाबीन, सूर्यफूल, मका आणि पाम तेलाची आयात मोठ्या प्रमाणात घटल्याने किमतीत १० ते १२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. आखातातील युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, त्याचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या दरावर होत आहे. नागपूरच्या बाजारपेठेत सोयाबीन, सूर्यफूल, मका आणि पाम तेलाची आयात मोठ्या प्रमाणात घटल्याने किमतीत १० ते १२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. हे युद्ध पुढील १५ दिवस असेच सुरू राहिले, तर खाद्यतेलाचे भाव आणखी १० ते १२ टक्क्यांनी वाढण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

बीड ■ वर्ष ५ ■ अंक ३०७ ■ मंगळवार, दि. १७ मार्च, २०२६ ■ पोस्टल दिनांक १८ मार्च, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.
BEED ■ Year-5 ■ Issue-307 ■ Tuesday 17 March, 2026 ■ Postal Date 18 March, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

## कोणाळे सारखे अधिकारी असे किती पण मयत व्यक्तींना जिवंत करतील

# मढ्यांच्या टाळूवरचे लोणी खाणारे आजपर्यंत ऐकले होते ते आज धस अण्णांनी बीडकरांना दाखवून दिले

## अनेक बांधकाम मजुरांनी तर व्हाईट हाऊस अन् बुर्ज खलिफा मध्ये काम केल्याचे प्रमाणपत्र दाखल

मुंबई । किसान न्युज

**बीड जिल्ह्यात बांधकाम कल्याण कामगार कार्यालयात मोठ्या प्रमाणात बोगसगिरी सुरू असून, याप्रश्नी आ. सुरेश धस यांनी लक्षवेधी सूचना मांडून शासनाचे लक्ष वेधून हा मुद्दा विधानसभेत गाजवला आहे. तर २०13 मध्ये मयत व्यक्ती जिवंत दाखवून त्यांच्या नावावर अनुदान उचलले आहे. हे पुरावेच दाखवले आहेत. तसेच यामध्ये अनेक कामगारांचे स्वयं घोषित पत्र बोगस असून अनेकांनी तर व्हाईट हाऊस अन् बुर्ज खलिफा येथे काम केल्याचे प्रमाणपत्र दिले असल्याचा उल्लेख केला आहे.**

बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार कार्यालय नेहमीच काहींना काही कारणाने चर्चेत असतो, सध्या येथील दलालांची जोरदार चर्चा सुरू असून, दलालांना पैसे दिले की, कोणतेही अनुदान मिळते मात्र जे खरे कामगार आहेत. त्यांना मात्र योग्य कागदपत्रे असून ही अनुदानाची प्रतिक्षा करावी लागत. तेच जर दलालाला ३० टक्के रक्कम दिली की, महिन्याच्या आत अनुदान प्राप्त होते. यामुळे येथे फक्त पैसा फेको असा कारभार सुरू आहे. आतातर या विभागाचा घोटाळाच विधानसभेत गाजला आहे. मयत व्यक्तीला जिवंत दाखवून चक्क त्याच्या नावावर अनुदान उचलण्यात आले आहे. त्या व्यक्तीचे नाव कमलाकर रंगनाथ मुडेगावकर असे असून त्यांच्या घरात जो फोटो लावला आहे त्यावर मृत्यू दि. २८-९-२०२३ असा आहे. तरीही या व्यक्तीने ९-४-२०२३ ते २०-०८-२०३ असे असे शंभर दिवस काम केले. ज्या अंबाजोगाई नगरपालिकेने यापूर्वी या व्यक्तीचा २९-९-२०१३ रोजी मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र दिले त्याच नगरपालिकेने परत ३०-१०-२०२३ ला मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र दिले. या प्रमाणपत्राच्या आधारे वारसांना २ लाख ३० हजार अनुदान उचलण्यात आले. हा प्रकार

» पान २ वर

### ज्यांना अनुदान तातडीने मिळाले तेच बोगस?


**शिष्यवृत्ती, लग्न किंवा कोणत्याही अनुदानासाठी बांधकाम लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केलेले तपासले की, सत्य समोर येईल कारण जे बोगस लाभार्थी आहेत ते सरळ दलालांना ३० ते ४० टक्के रक्कम देतात. अन् त्यांचे अनुदान काही दिवसांत अथवा महिन्याच्या आत मंजूर होते. तर जे खरे बांधकाम कामगार आहेत ते दलालांना पैसे देत नाही यामुळे त्यांचे अनुदान मंजूर होण्यासाठी सहा महिने वर्ष लागतात ते खरे असे म्हणता येईल यामुळे केवळ अनुदान मंजूर कधी झाले आणि अर्ज कधी आला होता यची चौकशी करावे त्यासाठी लांब जाण्याची गरज नाही अशी ही चर्चा सुरू आहे.**


### कामगारांचे कार्यालय उघडून बसलेल्या दलालांना लगाम लावा

**शहरात अनेक ठिकाणी कामगारांच्या नावाने सेवाभावी संस्थाचे रजिस्ट्रेशन किंवा कामगार कार्यालय उघडून बसलेले खरे दलाल आहेत. यांची ही चौकशी होणे आवश्यक असून यांच्याच ओंजळीने हे अधिकारी पाणी पितात, तसेच अर्ज भरण्यापासून ते पेट्या वाटप असो की, इतर साहित्य हे याच कार्यालयातून वाटप करण्यात येते. यासाठी मोठी रक्कम वसुल केली जाते. यामुळे आधी यांची दुकानदारही बंद करावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

### मुळूक,के.के.वडमारे यांच्या तक्रारीला यश


**बोगस बांधकाम कामगार प्रकरणी के.के. वडमारे यांनी तक्रार करीत याची चौकशी नाही झाली तर कामगार मंत्र्यांच्या दालनासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनीही तक्रार केली होती. हा प्रश्न आज आ. धस यांनी विधानसभेत गाजवला असल्याने के.के.वडमारे, मुळूक यांच्या त्कारीला यश आल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.**





प्रमाणपत्र क्रमांक / Certificate No. ३८९ / 389 — नमुना - ६ / Form - 6
महाराष्ट्र शासन / GOVERNMENT OF MAHARASHTRA
आरोग्य विभाग / HEALTH DEPARTMENT
अंबाजोगाई नगर परिषद / Ambajogai Municipal Council
मृत्यु प्रमाणपत्र / DEATH CERTIFICATE
(Issued under section 12/17 of the Registration of Births & Deaths Act, 1969 and Rule 8/13 of the Maharashtra Registration of Births and Deaths Rules,2000.)
This is to certify that the following information has been taken from the original record of death which is the register for Ambajogai Municipal Council of Tahsil / AMBAJOGAI of District BEED of MAHARASHTRA State.
Full Name of Deceased: KAMLAKAR RANGANATHRAO KULKARNI MUDEGAONKAR — Sex: MALE
Date of Death: 28-09-2013 — Place of Death: HOME - DESHPANDEGALLI AMBAJOGAI
Full Name of Father / Husband: RANGANATHRAO KULKARNI MUDEGAONKAR
Address of Deceased at the time of Death: DESHPANDEGALLI AMBAJOGAI — Permanent Address of deceased: DESHPANDEGALLI AMBAJOGAI
Registration No: 1164 — Date of Registration: 25-10-2013
Date of issue of certificate: 28-10-13
Signature of the issuing authority

२०१३ मध्ये लाभार्थी मयत झालेला



शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम २०१५/प्र.क्र.२३७/पंरा-३ दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ सोबतचे सहपत्र
प्रमाणपत्र
(बांधकाम कामगाराने मागील एका वर्षात ९० दिवस काम केल्याचा दाखला)
प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती कमलाकर रंगनाथराव मुडेगावकर ... नाक्यावर रोजंदारीवर बांधकामाचे काम करतात. त्यांनी मागील वर्षात ९० दिवसांपेक्षा अधिक दिवस खालील मालकांकडे काम केलेले आहे.
मागील वर्षभरात काम केलेले एकूण दिवस १०० दिवस
R.B.CONSTRUCTION PROPRIETOR
पृष्ठ ३ पैकी ३

२०२३ मध्ये ९० दिवस काम केल्याचे प्रमापत्र

### कामगारांची तपासणी करण्याची मागणी

**बांधकाम,पलंबर, सुतार जे असंघटीत काम आहेत. यांनी नोंदणी करुन शासन त्यांना साहित्य तसेच विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप आणि लग्नासाठी अनुदान तसेच कामावर मयत झाल्यास अनुदान देण्यात येते, मात्र यामध्ये खरे कामगार नगन्य असून बोगस कामगारांच्या भरणा अधिक आहे. या योजनांचा लाभ बोगस कामगार उचलत असून कारण की, ते सरळ दलालांना पैसे देऊन ते लाभ घेतात अन् खरे कामगार मंजुरी मिळेल याची वाट पहात बसतात. यामुळे कामगारांची चौकशी करुन खऱ्या कामगारांना न्याय द्यावा.**

## भीमजयंतीच्या परवानग्या रोखू नका

### वंचित बहुजन आघाडीचा इशारा

बीड । किसान न्युज

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात भीमजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. आनंदोत्सव साजरा करणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे आणि आपली सामाजिक-सांस्कृतिक अभिव्यक्ती मांडणे हा अधिकार भारतीय नागरिकांना भारतीय संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. तरीही बीड जिल्ह्यात जयंती उत्सव समित्यांना डॉल्बी साऊंड सिस्टिमसाठी परवानगी देताना प्रशासनाकडून जाचक अटी घालण्यात येत असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

» पान २ वर

## चर्मकार समाजाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

### जळीतप्रकरणी आरोपींवर कडक कारवाईची मागणी

बीड । किसान न्युज

बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चर्मकार समाजाच्या विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले. चर्मकार एक्य परिषद महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित या आंदोलनात समाजातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी संत गुरु रविदास महाराज अध्ययन केंद्र, साहित्याचे स्टॉल, ग्रंथालय तसेच गोपीनाथ गाडे यांच्या



घर व दुकान जाळण्याच्या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या घटनेमुळे गाडे कुटुंब

» पान २ वर

## दिव्यांगाच्या हक्कासाठी गेवराई तालुक्यातला छावा अखेर मैदानात

### गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप साहेब नुसतं पत्र देऊन जमतं नसतं थेट कारवाई कराच

गेवराई । किसान न्युज

महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या एकूण उत्पन्नाच्या ५% निधी हा दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करणे अनिवार्य आहे. मात्र, गेवराई तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये या निधीचे योग्य नियोजन झाले नसून तो लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी 'छावा क्रांतिवीर सेना, महाराष्ट्र राज्य' संघटनेचे जिल्हा प्रमुख राहुल चाळक यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री व ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे.छावा क्रांतिवीर सेनेने आपल्या निवेदनात प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत, तालुक्यातील सर्व



ग्रामसेवकांना आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांना ५% निधी खर्च करण्याबाबत तात्काळ लेखी आदेश देण्यात यावेत. थकीत निधीचा वापर,ज्या ग्रामपंचायतींनी मागील वर्षाचा निधी खर्च केला

» पान २ वर

रमजान मुबारक 27
आज का इफतार 06.41
कल की सहर 05.11

## आरटीई प्रवेशासाठी शाळांच्या अंतराची अट रद्द

### पालकांना दिलासा, अर्जाची मुदत २५ मार्चपर्यंत वाढ

बीड । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के मोफत प्रवेश प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला असून, शाळा व विद्यार्थ्यांच्या घरातील अंतराची अट शिथिल (रद्द) करण्यात आली आहे. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील पालकांना मोठा दिलासा मिळाला असून, आता अधिक शाळांचे पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाले आहेत. शिक्षण संचालनालयाने आरटीई प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत २५ मार्चपर्यंत वाढवली आहे. यापूर्वी अर्ज प्रक्रियेत घराजवळील (एक किलोमीटरच्या परिसरातील) शाळांना प्राधान्य देण्याचा नियम होता. मात्र, या अटीमुळे अनेक पालकांना इच्छित शाळा निवडता येत नव्हती. काही ठिकाणी परिसरात शाळा नसल्याने अर्ज प्रक्रियेत अडचणी निर्माण होत होत्या. दरम्यान, या प्रकरणी न्यायालयात सुनावणी झाल्यानंतर अंतराची अट शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता पालकांना त्यांच्या पसंतीनुसार अधिक दूरच्या शाळाही निवडता येणार आहेत. शिक्षण विभागाने यासंदर्भात

» पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 157,000
२२ कॅरेट 152,000
चांदी प्रतिकिलो 265,000

## ठाणे जिल्ह्यातील अल्पवयीन मुलीचा पाटोद्यात विवाह

### चार जणांवर गुन्हा

बीड । किसान न्युज

ठाणे जिल्ह्यातील एका पंधरा वर्षीय मुलीचा विवाह पाटोदा तालुक्यातील उंरविहीरा येथील व्यक्तीशी २७फेब्रुवारी रोजी लावण्यात आला. या प्रकरणात ठाणे जिल्ह्यातील पडघा पोलिस ठाण्यात पाटोदा व आष्टीतील चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाऊसाहेब तों (रा. उंबरविहीरा, ता. पाटोदा), गोवर्धन महाराज (चिंचपूर), अंबादास मोरे (कारखेल, ता. आष्टी), विलास हिलम (नांदीठाणे, बागपाडा, भिवंडी, पडघा, ठाणे) व इतर नातेवाईक यांच्या विरोधात ठाणे ग्रामीण अंतर्गत असलेल्या पडघा पोलिस ठाण्यात बालविवाह, अॅट्रॉसिटी तसेच पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ठाणे जिल्ह्यातील एका अल्पवयीन मुलगी तिच्या काका-काकीकडे राहते. यावेळी तिच्या ओळखीच्या विलास हिलम हा त्यांच्या घरी आला व त्याने मुलीच्या लग्नासाठी मुलगा बघितला आहे असे सांगितले. यावर या मुलीच्या

» पान २ वर

## डॉ.दिवाकर गुळजकर यांचे दु:खद निधन

बीड । किसान न्युज

शहरातील फिनिक्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. दिवाकर गुळजकर यांचे मंगळवार दि. १७ मार्च



२०२६ रोजी पहाटे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रासह बीड शहरात शोककळा पसरली आहे. डॉ. गुळजकर यांना वैद्यकीय क्षेत्रातील अनेक वर्षाचा अनुभव असल्याने रुग्णांचा कल होता. जिल्ह्यातील रुग्णांना उपचार करून दिल्यामुळे शहरात सर्वोतोपरिचित होते. त्यांनी अनेक गरजू रुग्णांना अल्प दरात तर काहींना मोफत उपचारही उपलब्ध करून दिले होते. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आपुलकी आणि आदराची भावना होती. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र मंगळवारी

» पान २ वर

# खा.बजरंग बप्पा धावले लाखो ठेवीदारांच्या मदतीला

## केंद्रीय सहकार अन् गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन केली ठेवी परत देण्याची मागणी



■ सरकारकडून मालमत्ता विक्रून ठेवी परत देण्याची कारवाई सुरू असल्याचे उत्तर

■ ठेवीदारांनी मानले खासदारांचे आभार

बीड । किसान न्युज

**अनेक मल्टीस्टेट संस्थेत बीड जिल्ह्यातील लाखो ठेविदारांचे कोट्यवधींच्या ठेवी अडकल्या आहेत. यामुळे हे ठेवीदार संकटात सापडले असून यांना दिलासा मिळावा म्हणून खा. बजरंग सोनवणे हे मदतीला धावले असून त्यांनी केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शाह यांची दिल्ली येथे भेट घेऊन ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देऊन दिलासा देण्याची मागणी केली. यावर त्यांनी सकारात्मका दर्शवली असून सरकार कडून ही याबाबत मालमत्ता विकून ठेवीदारांना ठेवी परत देण्याची कारवाई सुरू असल्याचे उत्तर देण्यात आल्याची माहिती खा. सोनवणे यांनी दिली. खा. सोनवणे यांनी या प्रकरणी लक्ष घातल्याने ठेवीदारांमधून त्यांचे आभार मानले जात आहे. बीड जिल्ह्यातील छोटे व्यापारी, नागरिक यांच्यासाठी माझा लढा सुरूच राहील असे खा. सोनवणे यांनी सांगितले आहे.**

ज्ञानराधा, साईराम, जिजाऊ, जिजामाता, शुभ कल्याण आणि राजस्थानी आदी मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्यांमध्ये लाखो ठेवीदारांचे कोट्यावधींच्या ठेवी अडकल्या आहेत. याप्रकरणी ठेवीदारांच्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल होऊन काही चेअरमन, संचालक सध्या जेलमध्ये आहेत. मात्र चार वर्षांपेक्षा जास्त काळ होऊन गेला मात्र या अडकलेल्या ठेवी काही परत मिळत नसल्याने ठेवीदारांचा जीव टांगणीला लागला आहे. या ठेवी दारांना दिलासा मिळावा म्हणून खा. बजरंग सोनवणे यांनी हा मुद्दा दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी लोकसभेत मांडला होता. यानंतर १० मार्च २०२६ रोजी ही हा प्रश्न मी लोकसभेत उपस्थित केला या दोन्ही वेळी सरकार कडून मल्टीस्टेट कोपरेटीव्ह सोसायटी क्ट २००२ अंतर्गत तपासणी करण्यात आली असून संबंधित संस्थांविरुद्ध वाइंडिंग-अप प्रक्रिया सुरू करून लिक्विडेटर नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच संस्थांची मालमत्ता विक्री करून कायदेशीर प्रक्रियेनुसार ठेवीदारांचे पैसे परत करण्याची प्रक्रिया सुरू

» पान २ वर